# आचारसंहिता आणि नैतिक मूल्य अनुशास्ती आणि व्यापार मनाईहुकुमांच्या अनुपालनाशी संबंधित धोरण

ETHICS & LEGAL COMPLIANCE | ISSUED: April 1, 2017 – REVISED: February 23, 2022

Magna जिथे व्यवसाय करते तेथील अनुशास्ती कायदे आणि नियमांसह सर्व न्यायाधिकार क्षेत्रांमधील कायद्यांचे अनुपालन करत असल्याची खात्री करण्यासाठी वचनबद्ध आहे. हे धोरण Magna International Inc. च्या सर्व कर्मचाऱ्यांना आणि तिचे कार्यरत गट, विभाग, संयुक्त कंपन्या आणि जागतिक स्तरावरील इतर कार्यरत विभाग (एकत्रितपणे, "Magna") या सर्वांना लागू आहे. हे धोरण कर्मचारी, अधिकारी, संचालक, सल्लागार आणि अभिकर्ते याच्यासह जे Magna च्या वतीने काम करतात त्या सर्व व्यक्तींनाही लागू होते.

- तुम्ही, यांच्यासह व्यवसाय करण्यावरील निर्बंधांशी संबंधित सर्व लागू कायदे आणि नियमांचे ("**अनुशास्ती कायदे**") पालन केलेच पाहिजे:
- देश आणि/किंवा देशांतील राजकीय उपविभाग जे अनुशास्तीशी संबंधित आहेत (एकत्रितपणे, "**प्रतिबंधित देश**"); आणि
- व्यक्ती, कंपन्या आणि उद्योग, त्यांचे प्रतिनिधी आणि एजंट यांच्यासह, जे दंडित देशांमधील रहिवासी आहेत किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय दंडित याद्यांमध्ये सूचीबद्ध आहेत (एकत्रितपणे, "**प्रतिबंधित व्यक्ती**").

## अनुशास्ती किंवा व्यापार निर्बंध म्हणजे काय आहे?

अनुशास्ती आणि व्यापार निर्बंध ह्या अशा उपाययोजना आहेत ज्यांची शासन किंवा आंतरराष्ट्रीय संघटना (जसे की संयुक्त राष्ट्रसंघ) अंमलबजावणी करते त्या काही देशांमध्ये व्यवसाय क्रियांना निर्बंधित करतात. आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा किंवा मानवी अधिकारांना हानिकारक ठरणाऱ्या धोरणे किंवा पद्धतींना बदलण्यासाठी प्रतिबंधित देश किंवा दंडित व्यक्तींच्या सरकारवर दबाव आणण्याचा त्यांचा हेतू असतो.

## प्रतिबंध कायदे कशास प्रतिबंध करतात?

प्रतिबंध कायदे विविध व्यवसाय क्रियांना प्रतिबंध करतात किंवा त्यावर मर्यादा आणतात, या गोष्टी सहभागी असलेल्या प्रतिबंधित देश आणि दंडित व्यक्तींवर अवलंबून असतात. प्रतिबंध कायदे बऱ्याचदा वस्तू, सेवा किंवा निधीच्या हालचालीवर मर्यादा घालतात. प्रतिबंध कायदे बहुधा, पण असे आवश्यक नाही, यावर मर्यादा घालतात किंवा प्रतिबंध करतात:

- दंडित देशातील कोणाहीकडून वस्तू, सेवा किंवा तांत्रिक माहिती विकणे किंवा विकत घेणे;
- प्रतिबंधित व्यक्तीकडून तो कोठेही स्थित असला तरी त्याकडून कोणत्याही वस्तू, सेवा किंवा तांत्रिक माहिती विकणे किंवा विकत घेणे;
- कोणत्याही प्रतिबंधित देश किंवा प्रतिबंधित व्यक्ती कडून किंवा कडे निधीचे हस्तांतरण, त्याचबरोबर प्रतिबंधित व्यक्ती (उदा: प्रतिबंधित बँक) कडून निधीची पोचपावती; किंवा
- कोणत्याही वस्तू, सेवा किंवा तांत्रिक माहितीची परवानगी दिलेल्या देशात परवानगी असलेल्या व्यक्तीला केलेली विक्री, जर विक्रेत्याला माहिती असेल की, वस्तू, सेवा किंवा तांत्रिक माहिती प्रतिबंधित देश किंवा प्रतिबंधित व्यक्तीसाठी वापरण्याचा हेतू त्यामागे आहे.

## एखादा देश किंवा व्यक्ती, प्रतिबंधित देश किंवा प्रतिबंधित व्यक्ती कसा होऊ शकतो?

विशेषतः, एक देश, व्यक्ती किंवा कंपनीला अनुशास्ती किंवा व्यापार निर्बंधाला सामोरे जावे लागू शकते कारण त्यांच्यावर बेकायदेशीर कृत्यांचा, जसे की दहशतवाद, मानवी अधिकारांचे उल्लंघन, बेकायदेशीर निर्यात, आण्विक विस्तार, आणि इतर गुन्हेगारी क्रिया यांत समाविष्ट झाल्याचा आरोप आहे. काही देश, जेथे Magna कार्यरत आहे (जसे की कॅनडा, अमेरिका आणि युरोपियन युनियन) प्रतिबंधित देश व प्रतिबंधित व्यक्तींच्या याद्या तयार करून प्रकाशित करतात. उदाहरणार्थ:

कॅनडा: https://www.international.gc.ca/world-monde/international_relations-relations_internationales/sanctions/current-actuelles.aspx?lang=eng
युनायटेड स्टेट्स: http://www.treasury.gov/resource-center/sanctions/Programs/Pages/Programs.aspx
युरोपियन युनियन: https://webgate.ec.europa.eu/fsd/fsf
संयुक्त राष्ट्रसंघ: https://www.un.org/securitycouncil/content/un-sc-consolidated-list#composition%20list

## धोरण

कोणत्याही प्रतिबंधित देश किंवा प्रतिबंधित व्यक्तीशी Magna व्यावसायिक व्यवहार करणार नाही. कोणतेही प्रतिबंधित देश किंवा प्रतिबंधित व्यक्ती समाविष्ट असलेल्या चालू किंवा संभाव्य व्यावसायिक व्यवहाराची जर तुम्हाला माहिती असेल तर, तात्काळ तुमच्या पर्यवेक्षक, गट, प्रदेश किंवा Magna कॉर्पोरेट वकीलांशी संपर्क साधा. आपण आपल्या पर्यवेक्षक, प्रांतिय अनुपालन अधिकाऱ्यांशी सुद्धा संपर्क साधू शकता, किंवा Magna हॉटलाइन द्वारे आपली चिंता रिपोर्ट करू शकता.

## प्रतिबंधित देश

आपण Magna च्या वतीने व्यवसाय करत असाल अशा कोणत्याही देशात लागू असलेल्या प्रतिबंधन कायद्यांचे पालन आपण केले पाहिजे. या व्यतिरिक्त, Magna चे धोरण जर असे अनुपालन स्थानिक कायद्याने संमत असेल तर तिच्या सर्व जागतिक कार्यामध्ये सर्वसाधारणपणे युनायटेड स्टेट्स आणि कॅनडाच्या प्रतिबंध कायद्याचे पालन करणे आहे.

कृपया लक्षात घ्या की प्रतिबंध कायदे गुंतागुंतीचे आहेत, देशानुसार बदलतात, आणि वारंवार बदलतात. कोणत्याही Magna व्यवसाय क्रियेच्या प्रतिबंध अर्जाबद्दल आपल्याला काही प्रश्न असतील तर, कृपया गट, प्रांतिय किंवा Magna कॉर्पोरेट वकीलाचा सल्ला घ्या.

## उल्लंघने

Magna अनुपालनाचे उल्लंघन अजिबात खपवून घेत नाही. कोणतेही उल्लंघन ही एक गंभीर बाब मानली जाईल आणि शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, ज्यामध्ये नोकरी वरुन हटवणे समाविष्ट आहे.

Magna ची आचारसंहिता आणि नैतिक मूल्य किंवा या धोरणाचे कोणी उल्लंघन करीत असल्याचे आपल्याला माहित असेल, तर तुम्ही गट, प्रांतिय किंवा कॉर्पोरेट वकीलांना याबाबत कळविले पाहिजे. आपण (i) आपल्या व्यवस्थापक, (ii) प्रांतिय अनुपालन अधिकारी (iii) आपले नैतिक मूल्य आणि मुख्य अनुपालन अधिकारी (iv) Magna हॉटलाइनशी सुद्धा संपर्क साधू शकता.

सूड-विरोधी धोरणानुसार, Magna ची आचारसंहिता आणि नैतिक मूल्य किंवा हे धोरण यांच्या कोणत्याही उल्लंघनाबद्दल सद्हेतूने माहिती देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे दंड, अवनती, हटवणे, निलंबन, भेदभाव यांपासून Magna कर्मचाऱ्यांचे संरक्षण करते.

## अधिक माहितीसाठी

अधिक माहिती किंवा सल्ल्यासाठी, कृपया समूह, प्रांतिय, किंवा कॉर्पोरेट वकील, प्रांतिय अनुपालन अधिकारी किंवा आपल्या उपाध्यक्ष आणि मुख्य अनुपालन अधिकाऱ्याशी संपर्क साधा.

---

| | |
|---|---|
| Issued: | April 1, 2017 |
| Revised: | February 23, 2022 |
| Next Review: | Q1 2025 |
| Issued By: | Ethics & Legal Compliance |
| Approved By: | Chief Compliance Officer, on behalf of Magna Compliance Council |